लोकमत

# घाळी महाविद्यालयात बागकाम कार्यशाळा

गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व येथील घाळी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातर्फे बागकाम कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य मंगलकुमार पाटील होते. यावेळी डॉ. ए. एम. गुरव, ए. के. जाधव, अक्षय घोरपडे, एस. एस. बागवेकर यांनी मार्गदर्शन केले. महेश चव्हाण, अनिल मगर, अनंत पाटील, जबिना पटेल उपस्थित होते.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ क्रिकेट संघात भक्ती किल्लेदारची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट संघात



कमला कॉलेजची खेळाडू भक्ती किल्लेदार हिची निवड केली आहे. शिवाजी विद्यापीठात झालेल्या आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेत भक्तीने चांगली कामगिरी केली होती. विद्यापीठाच्या संघ निवड समितीने भक्तीला विद्यापीठ संघात स्थान दिले. सध्या जयपूर येथील पौर्णिमा विद्यापीठाच्या मैदानात पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेत विद्यापीठाच्या संघातून भक्ती खेळणार आहे. तिला कमला कॉलेजच्या प्राचार्य तेजस्विनी मुडेकर, जिमखाना प्रमुख ज्योती गावडे, ताराराणी विद्यापीठाचे क्रीडा शिक्षक रघू पाटील व प्रशिक्षक पूजा ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.